
# १५. झाड आपला मित्र

- पाहा. बोला.




- चित्र पाहा. झाडाचे उपयोग सांगा.
- कोणत्याही एका झाडाचे चित्र काढा.
- झाडाने त्याच्या खोडाला फलक लावले आहेत. त्यावरील मजकूर वाचा. ते फलक का लावले आहेत ते सांगा.

**शिक्षकांसाठी :** झाडांच्या खोडांना लावलेल्या फलकांवरील मजकूर विद्यार्थ्यांना वाचून दाखवावा. विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावा. फलकावर लिहिलेल्या झाडांच्या उपयोगांव्यतिरिक्त आणखी कोणकोणते उपयोग आहेत, ते विद्यार्थ्यांना सांगावे.

- **ऐका. म्हणा व वाचा.**

झाडे लावा. झाडे जगवा.

झाडांमुळे सावली मिळते. झाडांमुळे गारवा मिळतो.

झाडे जमिनीची धूप थांबवतात.

झाडे हवा शुद्‌ध ठेवतात.

झाडांमुळे प्रदूषण कमी होते.

- **शब्दपट्‌ट्या वाचा. वाक्ये तयार करा व सांगा.**

झाड, झाडे, फुले, फळे, औषधी, देते, देतात.

**उदा.,** झाड फुले देते. झाडे फुले देतात.

- **वाचा. समजून घ्या.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ऑक्सिजन | क्सि | क + स + ि | वाळलेल्या | ल्या | ल + य + ा |
| फक्त | क्त | क + त | फांद्‌या | द्‌या | द + ्य + ा |

- **ऐका. पाहा व म्हणा.**

उद्‌या, नद्‌या, होड्‌या, गोट्‌या, मोठ्‌या, फांद्‌या.

- **'खेळातील स्वयंपाक' या कवितेत आलेले जोडाक्षरयुक्त शब्द पाहून लिहा.**

- **वाचा.**

| एक | अनेक |
|---|---|
| झाड | झाडे |
| फांदी | फांद्‌या |
| पक्षी | पक्षी |

| एक | अनेक |
|---|---|
| मूल | मुले |
| घरटे | घरटी |
| जनावर | जनावरे |

| एक | अनेक |
|---|---|
| फूल | फुले |
| फळ | फळे |
| पान | पाने |

- **खालील शब्दांमध्ये लपलेले शब्द शोधा. सांगा.**

**उदा.,** जनावरे. **शब्द –** जना, नाव, जव, नारे.

१. पाऊस २. वादळामुळे

- **उपक्रम :** तुमच्या परिसरातील सर्वांत जुने झाड शोधा. झाड व त्याच्या सभोवतालच्या परिसराचे निरीक्षण करा. त्या झाडाविषयी माहिती मिळवा. वर्गात सांगा.

**शिक्षकांसाठी :** द, ट, ठ, ड, ढ यांसारख्या अक्षरांना 'य' जोडताना ही अक्षरे पूर्ण लिहावी व त्यांना ' ्य ' (पाऊण आकारात) जोडावा, हे विद्‌यार्थ्यांच्या लक्षात आणून द्‌यावे. अक्षरे कशी जोडली जातात याचे निरीक्षण करण्यास सांगावे.